प्रेसनोट

दि ०९/०२/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहाता पो.स्टे.,जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | स्वाती गौतम मेश्राम, वय-३७ वर्ष, तलाठी सजा केलवड, वर्ग-३, तहसिल कार्यालय राहाता, ता.राहाता, जि.अहमदनगर रा.स्वामी रेसीडेन्सी, बस स्टॅण्ड पाठीमागे, राहाता, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ७०००/- तडजोडीअंती रुपये ६०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ६०००/- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांना त्यांचे खडकेवाके हददीतील वडीलांचे व चुलत्यांचे नावे असलेल्या शेत जमीनीचे वाटणी पत्र व हक्क सोडपत्रा आधारे नोंदी घेवुन फेरफार देणेकरीता यातील आरोपी लोकसेविका स्वाती गौतम मेश्राम, तलाठी सजा केलवड, तहसिल कार्यालय राहाता, ता.राहाता, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांच्याकडे ७०००/- रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांची आरोपी लोकसेविका यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयाकडे तक्रार दिली होती. तक्रारदार यांनी लाच मागणी बाबत दिलेल्या तक्रारीवरुन दि.०९/०२/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेविका मेश्राम यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ७०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ६०००/- रुपये लाचेची मागणी केली. सदरची रक्कम आज दि.९/२/२०२१ रोजी आयोजित लाचेचा सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेविका मेश्राम यांनी पंचासमक्ष केलवड तलाठी कार्यालय, ता.राहाता येथे स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर